पुढारी




ससून रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण कक्षाचे उद्घाटन करताना प्रकाश छाब्रिया, रितु छाब्रिया व इतर.

# ससूनच्या यकृत प्रत्यारोपण केंद्राचे उद्घाटन

## अल्प दरामध्ये होणार सेवा उपलब्ध

**पुणे : प्रतिनिधी**

मुकुल माधव फाउंडेशनच्या एक कोटी ३० लाख रुपयांच्या अर्थसहाय्यातून ससून रुग्णालयात रविवारी यकृत प्रत्यारोपण केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. न्यूरोफिजिशियन डॉ. आर. एस. वाडिया व ससून रुग्णालयात यकृत प्रत्यारोपण झालेल्या पहिल्या दोन रुग्णांच्या हस्ते हे उद्घाटन झाले. या वेळी फिनोलेक्सचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितु छाब्रिया, होप फाउंडेशनच्या अध्यक्षा अरुणा कटारा, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर नणंदकर, माजी अधिष्ठाता डॉ. अजय चंदनवाले उपस्थित होते.

यावेळी डॉ. सुधीर नणंदकर म्हणाले, शासकीय रुग्णालयांकडे जाण्यासाठी रुग्ण फारसे इच्छुक नसतात. परंतु, गेल्या काही वर्षात ससूनने आपल्या आरोग्यसेवेत आमूलाग्र बदल केले आहेत. यामुळे येथे आता अल्पदरात यकृत प्रत्यारोपण करता येईल. रितु छाब्रिया म्हणाल्या, याआधीही ससूनला नवजात शिशू अतिदक्षता विभाग, एन्डोस्कोपी केंद्र, लेझर डेंटल युनिट, विश्रांती कक्ष अशा सुविधा उपलब्ध केल्या आहेत.

### आणखी एक कोटीची देणगी

प्रकाश छाब्रिया यांनी आणखी एक कोटी रुपये ससूनला देत असल्याचे जाहीर केले. ही देणगी यकृत प्रत्यारोपण केंद्राच्या रिकव्हरी कक्षाच्या उभारणीसाठी वापरली जाणार आहे.